भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील वाहन-चालकांना अतिकालिक भत्ता मंजूरी बाबत.

---

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्र. ईएसटी १०७९/४९९५/सीआर २०५८/३१-अ
मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक २८ फेब्रुवारी १९८२.

निर्णय:- भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील वाहन-चालकांना अतिकालिक भत्ता मिळावा अशी त्यांच्या कामगार संघटनेची बरेच दिवसापासूनची मागणी होती या मागणीवर सांगोपांग विचार करून शासन आता असे आदेश देत आहे की, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील वाहन-चालकांना खाली नमूद केलेल्या दरा प्रमाणे अतिकालिक भत्ता मंजूर करण्यात येत आहे.

१) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील वाहन-चालकांनी त्यांच्या ठरलेल्या नऊ तासांपेक्षा जास्तीचे काम केले तर प्रत्येक अर्ध्या तासाच्या जादाच्या कामासाठी २५ पैसे या दराने अतिकालिक भत्ता देण्यांत यावा.

२) वाहन-चालकांनी रविवारी किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केले तर प्रत्येक कामाच्या तासास ३७ पैसे, जास्तीत जास्त दिवसाला ३ रु. या दराने अतिकालिक भत्ता दिला जावा.

३) जिल्ह्याच्या बाहेर वाहन गेले तर वाहन-चालकांनी ९ तासांच्या पेक्षा जास्त तास प्रत्यक्ष गाडी चालविली तरच त्यांना अतिकालिक भत्ता देय राहील. त्यांनी एखाद्या दिवशी वस्ती केली तर त्या वस्तीच्या तासाला मात्र अतिकालिक भत्ता मिळणार नाही. कारण अशा प्रकरणी ते प्रवास आणि रोजचा भत्ता मिळण्यास पात्र असतात. मात्र अशा मुक्कामाच्या ठिकाणी त्यांनी जर ९ तासांपेक्षा जास्तीचे काम केले तर मात्र त्यास वरील एक प्रमाणे (म्हणजे अर्ध्या तासास जादाचे कामाचे २५ पैसे) अतिकालिक भत्ता देय राहील.

यावर होणारा खर्च वाहन-चालकांच्या पगार व भत्ता ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकला जातो त्याच लेखाशिर्षाखाली चालू सालातील तसेच यापुढे मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यांत यावा.

वरील दर हे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना सध्या लागू असलेल्या दरानुसार देण्यांत आलेले आहेत.

ज्या दिनांकापासून हे आदेश निर्गमित होणार आहेत त्या दिनांकापासून हे अतिकालिक भत्याचे दर लागू करण्यांत येत आहेत.

----२

Office of The Collector,
Date - 9 MAR 1982

वरील आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिकरित्या संदर्भ क्रमांक बीआर ८९ / ईअेतपी, दि. ८-२-१९८२ ने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

राज्यपालांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अॅना कुरीयन )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप-संचालक, पुणे/ औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक
सर्व जिल्हा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.
सर्व जिल्ह्यांतील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील हे. इंजिनिअर
सर्व जिल्हाधिकारी
वित्त विभाग
नियोजन विभाग
मंत्रालयांतील इतर सर्व विभाग
ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने.